स्थायी समितीच्या **बुधवार दिनांक 30–11–2016** रोजी **दुपारी 12–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | मा. सदस्य/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत | सभापती |
| 2. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 3. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 4. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्य |
| 7. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्या |
| 8. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्या |
| 9. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 10. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 11. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 12. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 2. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्य |
| 3. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्य |
| 4. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 805:– {विद्युत विभाग} लकडगंज झोन क्र.०८, प्रभाग क्र. ३२ (ब) मध्ये नवरात्र गेट ते लखपती चौक क्वेटा कॉलनी येथे १० मिटर उंच ऑक्टॅगोनल खांब व फिटींग तसेच विविध ठिकाणी १२.५ मिटर मास्ट लावुन प्रकाश व्यवस्था करण्याकरीता ई-निवीदा बोलाविल्या असता, मे. राहूल कन्स्ट्रक्शन्स, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा २.२ % ने कमी असलेली रु.३१,६९,९३५/- ची एकमेव निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 806ः—</u>** प्रभाग क्र. 1(ब) कुकरेजा नगर जरिपटका येथील प्रस्तावित
**{उद्यान विभाग}** उद्यानात विविध विकास कामे करण्याचे कामास स्थायी समिती ठराव क्र. 440/दि. 29/08/2016 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | निविदा दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. श्री. कन्सट्रक्शन | प्राकलनीय दर | रू. 38,02,756/— |
| 2 | हिरवळीची कामे | मे. श्री. कन्सट्रक्शन | प्राकलनीय दर | रू. 2,67,488/— |
| | | | एकूण रू : | रू. 40,70,244/— |

वरील एकत्रित रू 40,70,244/— रक्कमेच्या निम्मतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 807ः—</u>** प्रभाग क्र. ४६ ब चिटणवीसनगर येथील रस्त्याचे
**{लोककर्म झोन.०५}** डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. फोनिक्स इंजिनिअरींग यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४९,६८,३८०/— रकमेची निविदा मंजूर करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 808ः—</u>** झोन क्र.1, प्रभाग क्र. 68 अ, मधिल विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था
**{विद्युत विभाग}** करण्याबाबत (सप्तगिरी नगर, जयदुर्गा— ३, न्यु पंचतारा सोसायटी, नगरविकास सोसायटी तसेच विविध ठिकाणी) ई—निविदा बोलविली असता, में. साधना इलेक्ट्रीकल, नागपुर, यांची प्राकलनिय दरापेक्षा ३.१९ टक्के ने कमी असलेली निम्नतम दराची म्हणजे रू. २९,६३,०४७/— च्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 809ः—</u>** प्रभाग क्र. ४१ ब महाल येथे कुंभारपूरा गाडीखाना मस्जिद
**{लोककर्म विभाग}** जवळ रस्त्यांचे सिमेंटीकरण करणे व आर सी सी पाईप लाईन टाकण्याचे कामास्तव प्राप्त २ निविदांपैकी मे. अमित कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरांपेक्षा १०.६६ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. २६,८०,१८२/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 810ः—</u>** नागपूर महानगरपालिका व लोकमत वृत्तपत्र समुह संयुक्त
**{कार्य. अभि. प्रकल्प}** विद्यमाने कस्तुरचंद पार्क येथे 200 फुट उंचीचा राष्ट्रध्वजासहित ध्वजस्तंभ उभारण्यात येणार आहे. प्रकल्पाकरिता महानगरपालिका परिघीय सौदर्यीकरण, Landscaping, सुरक्षा भिंत व इतर स्थापत्य, विद्युतीकरणाची कामे यांचा समावेश आहे. प्रकल्पाची प्राकलनिय राशी रू. 1,29,28,800/— ला मान्यता प्रदान करणे व या कामास्तव .. मे. डिझाईन सेल यांची एकुण प्राकलनिय राशीवर 2.76 टक्के प्रमाणे रूपये 3,56,862/— सेवा शुल्क राशी देण्याच्या प्रश्न तसेच, प्रकल्पाची स्थापत्य व विद्युतीकरणाचा कामाची निविदा मागविण्याची परवानगी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 811</u>:— स्थायी समितीचा ठराव क्र. ३७, दि. १७/०५/२०१२
{हॉट मिक्स प्लॅन्ट} नुसार जेट पेंचर मशीनद्वारे खड्डे, रोड कट्स दुरुस्ती करण्याचा प्रस्तावा अंतर्गत पहिल्या वर्षी काम समाधनकारक असल्यास कराराचा कालावधी पुढील 2 वर्षाकरिता वाढविण्यात येईल. 3 वर्षानंतर मा. स्थायी समितीची मंजुरी प्रापत करुन पुढील 2 वर्षाकरिता कराराचा कालावधी वाढविण्यात येईल. उपरोक्त काम हे 3 वर्षाच्या कालावधीकरिता प्रस्तावित असून, या कामास अंदाजे 15.0 कोटीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे व रु. 18128800/— ची निविदा प्रसिद्ध करण्यास मान्यता दिली आहे. उर्वरित काम अर्थसंकल्पीय अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करण्याची मंजुरी प्राप्त आहे.

तसेच ठराव क्र. 179 दि. 12/11/2012 नुसार उक्त कामाकरिता मे. अंजनी लॉजिस्टीक यांची वाटाघाटी नंतर प्राकलनीय दरापेक्षा 30% जास्त असलेली रु. 2,35,67,440/— ची निविदा मान्य केली आहे.

तसेच, जेट पॅचरद्वारे खड्डे भरण्यासाठीच्या दराबाबत मा. मुख्य अभियंता व मा. अति आयुक्त—2 यांनी मे. अंजनी लॉजिस्टीक सोबत केलेल्या वाटाघाटी नुसार मे. अंजनी लॉजिस्टीक यांनी निविदेतील दर रु. 1040/— प्रति चौ. मिटर पेक्षा कमी केले असून सुधारीत दर रु. 1015/— दरावर सदर काम करण्यास लेखी संमती सादर केली आहे. जेट पॅचरद्वारे मागिल 3 वर्षात करण्यात आलेल्या कामाच्या आधारे पुढील 2 वर्षाकरिता त्यांचे वाटाघाटी दर रु. 1015/— प्रति चौ.मी. नुसार अदमासे 75000 चौ.मी. कामाकरिता एकूण प्राकलन रु. 7,61,25,000/— ला प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, जेट पॅचरद्वारे खड्डे बुजविण्याच्या कामाचा कालावधी निविदेती मूळ अटी व शर्तीनुसार पुढील दोन वर्षाकरिता वाढविण्याकरिता मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 812</u>:— प्रभाग क्र. ९ अ व ब नेहरू कॉलनी, पेंशननगर,
{लोककर्म झोन.१०} गिटटीखदान, पोलिस लाईन टाकळी येथे रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. आर. एम. दयारामानी यांची मुळ प्राकलनिय दराची रू. २९,९९,७८७/— ( एकोणतीस लक्ष नव्यानऊ हजार सातशे सत्यांशी फक्त ) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 813</u>:— नागपूर शहर एकात्मीक रस्ते योजनेसंदर्भातील महाराष्ट शासन
{लोककर्म झोन.०७} निर्णय दि. 23 फेबुवारी 2001 अंतर्गत स्थापीत सुकाणू समितीच्या दि. 10/05/2016 ला झालेल्या आदेशास अनुसरून क्रॉडक रोड (भाग —2), गोळीबार चौक ते मारवाडी चौक चा रस्त्याचे कामाचे कंत्राटदार मे. फोनिक्स इंजिनियरींग,नागपूर यांना भुगतान होण्याचे दृष्टीने रू. 63,01,104/— एम.एस.आर.डी.सी. मध्ये म.न.पा.चा हिस्सा म्हणून जमा करण्यास तसेच याकरीता पद क्र. A22001330801 (370) अंतर्गत तरतूद उपलब्ध करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 814</u>:— प्रभाग क्र. 29 ब मोमीनपूरा येथील हैदरी रोडचे सिमेंट {लोककर्म
झोन ०६} कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त ३ निविदा पैकी मे. एस के एन्टरप्राईजेस यांची प्राकलनीय दरांपेक्षा ६.११ प्रतिशतने अधिक दराची रू. २६,५१,०४७/— रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 815</u>:— प्रभाग क्र. ९ अ पेन्शन नगर मेन रोड, समाधान नगर, येथे {लोककर्म झोन १०} रस्त्यांचे डांबरीकरण करण्यास्तव निविदा मागविल्या असता मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनिय दराची रू. २७,९७,१४४/— (सत्ताविस लक्ष सत्यानव हजार एकशे चौरेचाळीस फक्त) ची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 816</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर